# नगर परिषद कार्यालय, मेहकर, जि. बुलडाणा

## जाहीर प्रसिध्दीकरण

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समायोजित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेवून त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ दिनांक २८/४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. सदर अध्यादेश निर्गतिक करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने पूर्वी असलेल्या सेवा अधिनियमांतर्गत अधिसूचित करुन त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे. त्यामध्ये नगर परिषद या नागरी स्थानिक संस्थांचा समावेश आहे. नागरी संस्थांमार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा- सुविधांपैकी नागरीक केंद्रबिंदू मानून, नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणाऱ्या व ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त फायदा घेतलेला आहे व ज्या सेवा महत्वाच्या आहेत अशा सेवा अध्यादेशाच्या कलम ३ (अ) नुसार अधिसूचित करण्याबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एमसीओ-२०१५/ प्र.क्र. १८९/नवि १४, दिनांक २३/०६/२०१५ नुसार मा. शासनाने निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार एकूण ७४ सेवांपैकी ६५ लोकसेवा स्थानिक प्राधिकरणांनी अध्यादेशाचे कलम ३ (अ) नुसार अधिसूचित केल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ कलम ३ (अ) अन्वये नगर परिषद कार्यालय, मेहकर कडून नागरिकांकरीता उपलब्ध करुन देत असलेल्या एकूण ६५ लोकसेवांची सुची, आवश्यक कागदपत्र, सेवा शुल्क फि, नियम कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आले आहे. तसेच शासन निर्णयाद्वारे विहीत केलेल्या सेवांची यादी मेहकर नगर परिषद कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

स्वा/- (रामराजे कापरे)
प्रशासक तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद, मेहकर

Scanned by CamScanner